# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/०६/२०२४ (शनिवार) सायंकाळ**

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक
## पोलीस स्टेशन भिवापूरची कार्यवाही

दिनांक २९/०६/२०२४ चे १०.३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोस्टे भिवापूर हद्दीतील मौजा टाका येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची टिप्पर व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून मौजा टाका येथे पोलिस स्टाफ यांनी नाकाबंदी करून टिप्पर क्र. एम एच– ३६/एए ४३५८ चा चालक आरोपी नामे – नितेश रमेश लसणे वय ३० वर्ष रा. पाहारणी ता. नागभिड जि. चंद्रपुर याने आपल्या वाहनात ०६ ब्रास रेती मालक नामे– २) सचिन सुनील बोकडे वय ३२ वर्ष रा. चिचाळा ता. भिवापुर जि नागपुर याचे सांगणे वरून वाळुची चोरीने उपसा करून चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने त्यांच्या ताब्यातून १) टिप्पर क्रं. एम एच ३६/एए ४३५८ त्यामध्ये ६ ब्रास रेती कि. ३०,००० रू. तसेच टिप्पर क्रं. एम एच ३६ एए ४३५८ किंमती १५,००,०००/– रू असा एकूण १५,३०,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७, )४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल, नापोशि रविंद्र जाधव, पोशि मनोज चाचेरे, पोशि दीपक ढोले, निकेश आरीकर यांनी केली. पुढील तपास पोहवा प्रविण जाधव हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर